# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दिनांक. २६/०३/२०१८

## पोलीस-नक्षल चकमकीत ठार झालेल्या जहाल महिला नक्षलवादयाची ओळख पटली

उपविभाग एटापल्ली अंतर्गत पोमके कोटमी अंतर्गत येणाऱ्या मेढंरी जंगल परीसरात  सी-६० व पोमके कोटमी येथील पोलीस पार्टीचे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दिनांक २५/०३/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली होती. या चकमकीमध्ये एक जहाल महिला नक्षलवादी ठार झाली होती. सदर मृत महिला नक्षलवादयाची आज ओळख पटविण्यात आली असून सदर मृत महिला नक्षलवादयाचे नाव पाली उर्फ झुनकी मंंगु दोरपेटी रा. झारेवाडा, ता. एटा

ाल्ली, जि. गडचिरोली असून ती नक्षवादयांच्या कंपनी क्रमांक ४ मध्ये कार्यरत होती. नुकतीच तिची बदली प्लाटुन क्रमांक ३ मध्ये झाली होती.

तिच्यावर आठ पेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल असून तिचेवर सरकारने रुपये ४ लाख इतके बक्षीस ठेवले होते.

–